# ‘महाराष्ट्र देशा’, ‘पहावा विठ्ठल’ इंटरनेटवर

## उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आज प्रकाशन

**मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रातील शिवकालीन गडकिल्ल्यांचे विहंगम दर्शन घडविणारे ‘महाराष्ट्र देशा’ व पंढरपूरच्या वारीतील छायाचित्रांतून साक्षात विठ्ठलाची अनुभूती देणारे ‘पहावा विठ्ठल’ या शिवसेना कार्यप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या छायाचित्र ग्रंथांच्या ई आवृत्तीचे प्रकाशन उद्या, सोमवारी होणार आहे.**




हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस व ‘सामना’च्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून किंग्ज सर्कल येथील षण्मुखानंद सभागृहामध्ये सायंकाळी ६ वाजता एक विशेष कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला उद्धव ठाकरे यांच्या हस्ते या पुस्तकांच्या ई आवृत्तीचे प्रकाशन होईल. यानंतर प्रबोधन प्रकाशनतर्फे कार्यक्रम होणार असून त्यानंतर ‘केशवा माधवा’ हे दोन अंकी नाटक दाखविले जाणार आहे.

### शिवसेनाप्रमुखांची ‘रुद्राक्ष तुला’

■ नेपाळी श्रमिक मजदूर युनियनच्या वतीने सोमवारी शिवसेनाप्रमुखांची ‘रुद्राक्ष तुला’ करण्यात येणार आहे. हे रुद्राक्ष शिवसेनाप्रमुखांच्याच हस्ते शिवसैनिकांना देण्यात येणार आहेत.

### शिवसेनाप्रमुखांच्या ‘विचारांचं सोनं’ही ई-बुक स्वरूपात

*शिवसेनाप्रमुखांच्या निवडक भाषणांचे संकलन असलेले ‘विचारांचं सोनं’ हे पुस्तकही ई-बुक स्वरूपात उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्याचेही प्रकाशन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते यावेळी होईल. छापील पुस्तकांचे ई-बुकमध्ये रूपांतर करणाऱ्या ‘बुकगंगा डॉट कॉम’ संस्थेने शिवसेनाप्रमुखांच्या वाढदिवसानिमित्ताने शिवसैनिकांना ही अनोखी भेट दिली आहे.*

